**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः31.08.2025** **वारःरविवार**

---

•जपानचा दौरा आटोपून शांघाय शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान जपानहून चीनला पोहोचले.

•सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या विकास दरात एप्रिल ते जून या तिमाहीत लक्षणीय वृद्धी

•पंतप्रधान आज आकाशवाणीवरून करणार मन की बात

आणि

•धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील अपघातात ६ जणांचा मृत्यू

**<u>मोदी-जपान-चीनदौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी काल आपला जपानचा दौरा आटोपून शांघाय सहकार्य संघटनेच्या २५ व्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनमधील तियानजिन इथं पोहोचले. तिथं त्यांचं पारंपरिक पद्धतीनं स्वागत करण्यात आलं.

तत्पूर्वी आपल्या जपान दौऱ्यात पंतप्रधानांनी टोकियोमध्ये १६ प्रांतांच्या राज्यपालांना संबोधित केलं. जपानच्या विविध राज्यपालांना आणि भारतीय राज्य सरकारांना भागीदारी उपक्रमाचा लाभ घेण्याचं आणि उत्पादन, तंत्रज्ञान, नवोन्मेष, गतिशीलता, पायाभूत सुविधा, स्टार्ट-अप आणि एमएसएमई क्षेत्रात भागीदारी निर्माण करण्याचं आवाहन त्यांनी केलं. त्यानंतर जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा शिंकानसेन यांच्या समवेत पंतप्रधान मोदी बुलेट ट्रेननं, मियागी प्रांतातील सेंदाई इथं गेले. तिथल्या सेमीकंडक्टर उत्पादन उपकरणांच्या प्रमुख कारखान्याला त्यांनी भेट दिली.

चीनमध्ये आजपासून दोन दिवस शांघाय शिखर परिषद होणार असून परिषदेच्या अध्यक्षस्थानी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग असणार आहेत. या परिषदेला वीसपेक्षा अधिक देशांचे राष्ट्रप्रमुख आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचे १० नेते उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन ह्यांचा ह्या परिषदेत प्रमुख सहभाग आहे. या परिषदेत प्रादेशिक सुरक्षितता, दळणवळण, शाश्वत विकास आणि जागतिक सहकार्य यासारख्या मुद्द्यांवर पंतप्रधान मोदी देशोदेशीच्या नेत्यांबरोबर चर्चा करतील. या शिखर परिषदेत शांघाय सहकार्य संघटनेच्या २५ वर्षांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल आणि पुढील दहा वर्षांची विकास रणनीती स्वीकारली जाईल.

**<u>इंट्रो :</u>**

२०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या एप्रिल ते जून या तिमाहीत भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या दरात वाढ होऊन तो ७ पूर्णांक ८ शतांश टक्के झाला आहे. गेल्या पाच तिमाहींमधील हा उच्चांक आहे. पुण्यातील एक अर्थतज्ञ निलेश साठे यांनी आकाशवाणीशी बोलताना या दरवाढीचं स्वागत केलं आहे:

**<u>वंशावळ</u>**

तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीला शासनानं पुढील वर्षीच्या ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं जारी केला. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलतांना ही माहिती दिली. २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतुदी या समितीला लागू राहतील, असं या शासन निर्णयात नमूद करण्यात आलं असल्याचंही शिरसाट यांनी सांगितलं.

**अनुसूचित**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोगाच्या माध्यमातून राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक न्यायाची प्रतिबद्धता दाखविण्यासोबतच ती स्थापित करण्यासाठी आयोग कटिबद्ध आहे, असं प्रतिपादन आयोगाचे उपाध्यक्ष ॲडवोकेट धर्मपाल मेश्राम यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केलं.

बार्टी, टार्टी, सारथी, महाज्योती या संस्थांच्या कामकाजावर आयोगाचं लक्ष आहे. कामकाजात अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाईची शिफारस करण्यात येईल असंही मेश्राम यांनी सांगितलं.

**मकीबा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १२५ वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजऑनएआयआर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**शहा-नड्‌डा-चंपा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल गणेशोत्सवानिमित्त मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या निवासस्थानी गणरायाचं दर्शन घेतलं तसंच लालबागच्या राजाचं कुटुंबियांसमवेत दर्शन घेतलं. शहा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृहात व्यापक चर्चाही केली.

केंद्रीय आरोग्य मंत्री आणि भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्‌डा यांनी पुण्याचं ग्रामदैवत कसबा गणपती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतींचं काल दर्शन घेतलं. सदाशिव पेठेतलं साने गुरुजी तरुण मंडळ, तसंच कोथरूडच्या श्री साई मित्र मंडळाच्या गणरायाचंही नड्‌डा यांनी दर्शन घेतलं.

उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री आणि सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल सांगली जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्ह्यातील काही घरगुती तसंच सार्वजनिक गणेशोत्सवांना भेट दिली.

**आरक्षण**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांची आरक्षणविषयक समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांनी काल भेट घेतली. मराठा समाजातल्या उर्वरित नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र द्यायला सहा महिन्यांची मुदत हवी असं त्यांनी सांगितलं.

तर कुणबी प्रमाणपत्रांचा निर्णय तातडीनं लागू करावा असं जरांगे पाटील यांनी सांगितलं. जरांगे यांनी मांडलेल्या इतर मुद्यांवर त्यांचं म्हणणं मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येईल असं न्यायमूर्ती शिंदे यांनी स्पष्ट केलं.

**साखर कारखाने**

साखर कारखान्यांचं अर्थकारण भक्कम करायचं असेल, तर ते वर्षभर चालायला हवेत. त्यासाठी ते केवळ साखर किंवा उपपदार्थ उत्पादक न राहता, त्यांचं रूपांतर कृषी प्रक्रिया केंद्रांमध्ये झालं पाहिजे, असा सल्ला सहकार आणि बँकिंग तज्ज्ञ सतीश मराठे यांनी दिला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकार अध्यासनातर्फे आयोजित राज्यस्तरीय साखर परिषदेत, मराठे  काल बोलत होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

**डॉल्बीबंदी**

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी डॉल्बी आणि लेझर शो बंद करण्याचे आदेश काल जारी केले आहेत. तसंच जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी तहसीलदार पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा करून या आदेशाची कडक अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**<u>बीड अपघात</u>**

धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड जिल्ह्यातील पेंडगाव फाटा परिसरात काल सकाळी झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. ट्रकनं पायी चालणाऱ्या भाविकांना धडक  दिल्यानं हा अपघात झाला. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश पोलिसांना दिले असल्याचं उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी वार्ताहरांना सांगितलं. मृतांच्या कुटुंबांना आवश्यक ती मदत देण्यात येईल असंही त्यांनी नमूद केलं.

**<u>पाउस</u>**

धुळे जिल्ह्यात पावसाचा जोर कायम आहे. साक्री तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला आहे. त्यामुळे पांझरा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग टप्प्या टप्प्यात करण्यात येत आहे.

अकोल्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक घरांची पडझड झाली असून खरीप पिकांसह इतर पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी शहरातल्या आणि ग्रामीण भागातल्या पूरग्रस्त भागांना भेट देऊन पाहणी केली. बीडमध्येही अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे पूर्ण करुन सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. परळी वैजनाथ मध्ये झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत अशा सूचना आमदार धनंजय मुंडे यांनी स्थानिक प्रशासनाला दिल्या आहेत. लातूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळं अंदाजे दीडलाख हेक्टरवरील शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. पुरामुळे  550 गावांना फटका बसला असून जळकोट तालुक्यात एक व्यक्ती पुरात वाहून गेली.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील आणि तुरळक ठिकाणी जोरदार पाउस पडेल  असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**